# हिंदुधर्माचे स्वरूप : आचार सहिष्णुता, विचार-स्वातंत्र्य.

साम्ययोग : दैनिक पुरवणी

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ७४] सेवाग्राम, मंगळवार ता. २ जून १९६४ [मूल्य ५ न. पै.

## विश्वात जे काही बरे वाईट ते सर्व आपलेच

आज ज्या घरात आमचा निवास आहे तेथे येशूख्रिस्ताचे एक चित्र टांगलेले आहे. व भगवान येशूख्रिस्त असे त्याखाली लिहिले आहे. एका हिंदूच्या घरात ते चित्र पाहून मला फार आनंद झाला. मोठे पुरुष कोठेहि जन्माला येवोत त्यांच्यात आम्ही फरक करीत नाही ही फार मोठी उदार भावना आहे जी सुदैवाने थोडीफार आमच्या देशात आहे. परंतु अलीकडे भारतात भिन्न भिन्न धर्मानुयायात भांडणे दिसतात व हिंदूहि आपसात भांडतांना दिसत असले तरी हिंदूधर्मात एक उदारता आहे.

ख्रिश्चन धर्म येशूच्या नांवावर व मुसलमान धर्म महंमद पैगंबराच्या नांवावर चालतो. पण हिंदुधर्म तसा कोणत्याहि महापुरुषाचे नांवावर ओळखल्या जात नाही. म्हणजे तो सनातन धर्म आहे.

### हिंदुधर्मात मुख्य पांच गोष्टी आहेत

१. मानवतेला महत्व देऊन अहिंसा, सत्य इ. नीतीचे सिद्धांत पूर्णपणे मानायचे आणि ते आपल्या आचरणात उतरविण्याचा प्रयत्न करायचा.

२. जीवमात्रा विषयी कारूण्य भावना. जितके जीव त्या प्रत्येकात परमात्वतत्व पहावयाचे. हिंसेवर जगणारे काही जीव असले तरी ते अज्ञानाने ते करीत आहेत असे समजून शक्यतोवर त्यांनाहि संरक्षण द्यावयाचे. नाईलाज झाला तरच सापाला मारतीलहि पण त्यालाहि परमेश्वरी तत्व आहे असे मानायचे.

३. कोणी मेला म्हणजे जीवन संपले असे नाही. तो नवीन देह धारण करून तरी राहील किंवा सूक्ष्म रूपाने असेल. मेला म्हणजे एक मुक्काम हालला. जसा माझा दररोज हालत असतो तसा आपला एका देहातून दुसऱ्या देहात प्रवेश होतो. मेल्यानंतरहि जीवन आहे असे वाटणे.

४. ह्या जगात पूर्ण व्यवस्था व रचना आहे. अव्यवस्था नाही जगात काही तरी रचना आहे. संकल्प आहे. आणि त्यानुसार जीवन चालले आहे. विस्कळीतपणा नाही अशी हिंदूधर्माची श्रद्धा आहे. म्हणून हिंदूधर्माचा विज्ञानाशी कधी विरोध आला नाही. कारण आम्ही मानले आहे की जगात एक व्यवस्था आहे.

५. जीवनात आपण जे काही बरे वाईट करू त्याचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाही. भलेहि ते त्या व्यक्तीला भोगावे लागोत की समाजाला भोगावे लागोत पण कर्माचे फळ अटळ आहे.

अशी पंचविध श्रद्धा हिंदूधर्माची आहे. आणि ही श्रद्धा ज्यांची आहे तो हिंदू. साररूपाने इतर धर्मातहि ह्या गोष्टी आल्या आहेत. तेव्हा धर्म वेगवेगळे असले तरी ते सर्व आपलेच आहेत. त्यांनी आपणास मानवता शिकविली आहे.

**काय या संतांचे मानू उपकार**
**मज निरंतर जागविती**

### संतांना संकुचित बनवू नका

आम्ही संतांचे अनुयायी स्वतःला समजतो. परंतु जाति धर्य प्रांत-देश ह्या नुसार त्यांचे वेगवेगळे गट पाडतो. त्यांच्याबद्दल अभिमान बाळगतो. म्हणतो. आमच्या महाराष्ट्रात अमुक संत झाले. जसे आमच्या प्रांतात चांगले जंगल आहे, चांगले गोटे सापडतात. तसे

(पान २ वर कॉलम १ व २ वर)

## विदर्भातील कार्यकर्त्यांच्या बैठकीचा निर्णय

विदर्भातील आठ जिल्हयाच्या कार्यकर्त्यांची बैठक ता. २५ मे रोजी आर्वी तालुक्यातील साहूर गावी झाली.

ह्या बैठकीला श्री. रा. कृ. पाटील, श्री. दिनदयालजी गुप्ता, श्री. संतोषराव गोडे, अध्यक्ष वर्धा जिल्हा परिषद, श्री. सपकाळ अध्यक्ष, अकोला जिल्हा परिषद, श्री. गोविंदराव देशपांडे, श्री. मामासाहेब क्षीरसागर, श्री. शर्लेकर (नागपूर) श्री. एकनाथ भगत, श्री. रामकृष्ण आढे, श्री. मोतीलालजी मंत्री, श्री. नंदलाल काबरा, श्री. चिंतमणराव तिडके, श्री. वसंतराव साठे, (प्रजासमाजवादी कार्यकर्ते–नागपूर) कु. निर्मलाताई देशपांडे, श्री. बाबराव ठाकरे, श्री. श्री. शेषराव देशमुख, श्री. लताड, कु. पुष्पाबाई देसाई, श्री. बेलसरे वकील, श्री. ठाकुरदासजी बंग, श्री. वसंतराव बोंबटकर इ. कार्यकर्ते हजर होते.

विदर्भातील आठहि जिल्ह्याच्या कार्यकर्त्यांनी आपली शक्ति ग्रामदान आंदोलनात एका भागात केंद्रित करावी व एखादे सघनक्षेत्र कामासाठा निवडावे ह्या निर्णयावर वरील मंडळी आली.

आर्वी तालुका हे त्यासाठी उपयुक्त कार्यक्षेत्र ठरेल. तेव्हा आर्वी तालुक्यात त्यासाठी एक सप्ताह पाळण्याचा विचार पक्का झाला. ता. २ जून ते ९ जून हा कालवधि निश्चित करण्यात आला. ता. २ जून रोजी कारंजा गावी (अमरावती नागपूर मोटार मार्गावर) शिबिर होईल. आणि सात दिवस कार्यकर्ते ग्रामदान प्राप्तीसाठी फिरतील.

विदर्भाच्या आठहि जिल्ह्यांचे कार्यकर्त्यांनी त्यासाठी यावे असा प्रयत्न होत आहे.

## लोणी गावच्या पुढाऱ्यांचं पत्रक

आम्ही खाली सह्या करणारे जाहीर आश्वासन देत आहोत की,

१. आम्ही व्यवितशः अथवा सामुहिकरीत्या, आमच्या गावात फाटाफुट पाडण्याचे अथवा एकीला बाधा आणण्याचे कोणतेहि काम करणार नाही.

२. येती पांच वर्षेपर्यंत आम्ही कुणीहि

(अ) निवडणूकीला उभे राहणार नाही.

(ब) निवडणुकीचा प्रचार गावात व जिल्ह्यात करणार नाही.

साक्ष

| | |
|---|---|
| गो. बा. देशपांडे | दि. ल. चितळे |
| अमर मोरे | पां. कुबडे |
| रा. आ. बेलसरे | मोतीराम पैकुजी तिखे |
| मामा क्षीरसागर | महादेव काशीराव क्षीरसागर |
| ना. रा. पवार | माणिकाराव व्यंकटराव पाटील |
| | प. गं. दारोकर |

लोणी–२४।५।६४

## यूनेस्कोच्या सभेत नेहरूंना श्रद्धांजलि

भारताचे पंतप्रधान पं. जवाहर- लाल नेहरू यांना आज युनेस्कोच्या बैठकीत श्रद्धांजलि व्यक्त करण्यात आली. यूनोस्कोचे हे अधिवेशन दोन तास चालले. संघटनेच्या अधिकाऱ्यांनी ब प्रतिनिधीनी श्रद्धांजलि व्यक्त केली व त्यांच्या सन्मानार्थ एक मिनिट शांतता पाळण्यात आली.

पाकचे प्रतिनिधि कमाल रहीम म्हणाले, "काश्मीरच्या भवितव्याविषयीची बोलणी लौकरच सुरू व्हावयाची असल्यामुळे आमच्या या मोठ्या मित्राच्या मृत्यूने पाकिस्तानला अतीव दुःख होत आहे. पं. नेहरूंचा मृत्यु म्हणजे भारत, पाकिस्तान व काश्मीर येथील जनतेवरील संकट होय."

( पान १ कॉलम २ वरून )

हे संत आमच्या प्रांतातले आहेत. म्हणजे संतापेक्षा प्रांताबद्दलच अधिक गौरव आमच्या हचा चुकीच्या भावनेमुळे संत आम्हाला अभिमान बाळगायला उपयोगी पडतात; अभिमान सोडायला त्यांचा उपयोग होत नाही.

**शक्तीची वजाबाकी नको बेरीज हवी**

वास्तविक जगात जे काही पुण्य ते आपलेच व जगात जे काही पाप आहे तेहि आपलेच आहे. आम्ही स्वतःला महाराष्ट्रीय म्हणून घेतले म्हणजे जगावर आपला अधिकार उरत नाही. आम्ही स्वतःला हिंदु ससमजले की मुसलमान, शिख ह्यांच्या उत्सवात भाग घेण्यास अवकाश रहात नाही. अशा तऱ्हेने जातीचो, पंथाची बंधने व अलीकडे हे पक्षाचे नवे बंधन आले आहे आणि पक्षातहि गट आहेत. म्हणजे एकाचे दोन, दोनाचे चार, चाराचे आठ असे तुकडे करणं आमच्या अंगवळणी पडले आहे. त्यामुळे शक्तीची बेरीज न होता वजाबाकी होते. मोठे आकडे असले तरी वजाबाकीमुळे त्यांचा उपयोग राहत नाही.

**ग्रामदानाने ते साधेल**

बेरीज कशी करावी ? ती आपल्या गावापासून सुरू करावी. आम्हाला ह्या गावच्या लोकांनी सांगितले. प्रथम संपूर्ण गाव न घेता आम्ही गावातील काही लोक घेऊन त्यांच्याद्वारा हा प्रयोग करू पाहू इच्छितो. ह्याने तुमच्या बुद्धीचा विकास कसा होणार. त्यामुळे तुम्ही कुपमंडुक होता. मग तुम्ही हिंदुस्थानचा कारभार कसा सांभाळणार ? तेव्हा एक संपूर्ण गाव घ्या. त्यात सर्व प्रकारचे लोक असू द्या. म्हणजे सर्वांशी समान वागण्याचे शिक्षण मिळून बुद्धि व्यापक होईल. कारण तुम्हाला विविध प्रवृत्ति सांभाळाव्या लागतील, सर्वावर प्रेम करावे लागेल. आणि जो गोष्ट एका लहानशा त्रिकोणात सिद्ध होते तीच मोठ्या त्रिकोणातहि सिद्ध होते गावात जे सिद्ध झाले तेच देशालाहि लागू पडेल.

गाव एकवटा म्हणजे शेती व स्वयंपाक एकत्र करा हा माझा आग्रह नाही. परंतु एकमेकाच्या दुःखात सर्व जण सहभागी होतात. जमीन तर आपल्या जन्मापूर्वी होती व आपल्या मृत्युनंतरहि राहणारच आहे तेव्हा तिचे आम्ही मालक होऊ शकत नाही. ईश्वरच तिचा मालक. असे झाले तर गावे सौंदर्याने नटतील.

**लोकशक्ति उभी करणे हा हेतु**

सबंध जगात ज्या ज्या जमातीने पराक्रम केले से सर्व आमचे व ज्या चुका केल्या त्याहि आमच्याच असे झाले तर वाढत्या विज्ञानाच्या कालात सुख होईल. नाहीतर विज्ञान वाढेल तितके दुःख होईल. विज्ञानाची अशी शक्ति आहे की तिने जगात एकतर स्वर्ग नाहीतर दुःख निर्माण होईल.

तेव्हा वर्धा जिल्ह्यातील तमाम ९०० गावे ग्रामदान व्हावीत. ८०० गावे ग्रामदानी झाली तर मी म्हणेल ठीक आहे, जे झाले ते चांगलेच झाले पण [illegible] मला एक गोष्ट कळली गोवर्धन पर्वत उचलायला नुकत्याच जन्मलेल्या बाळाचाहि शक्ति लावावी लागली व तेव्हा भगवंताने करंगाळी लावली पर्वत उठला. तुम्ही महाराष्ट्रातले अक्कलवान लोक म्हणाल, भगवंतानेच हे काम का नाही केले ? भगवंताला लोकशक्ति वाढवायची होती. मला तेच हवे आहे. तेव्हा प्रयत्न करा व एक जिल्हा नाहीतर तालुका तरी ग्रामदानात द्या.

पडान–शिरसोली
१९-५-६४

* * *

**प्रगतिशील जगाची हानि**

प्रे. टिटो हे आपल्या संदेशात म्हणाले, 'आमचा परममित्र' थोर मुत्सद्दी आणि एक श्रेष्ठ पुरुष नेहरूंच्या रूपाने नाहीसा झाला. असून प्रगतिशील जगाची त्यांच्या मृत्यूने फार मोठी हानि झाली आहे."

**विनोबा पदयात्रा कार्यक्रम**

१ सोनेगाव
२ सावळी
३ कारंजा
४ ठाणेगाव
५ जऊरवाडा

# जगातील पत्रपंडितांची नेहरूंना स्वयंस्फूर्त श्रद्धांजलि

नवी दिल्ली, ता. २८

**पंतप्रधान नेहरूंच्या निधनानंतर जगातील पत्रपंडितांनी चालू शतकातील एका महान व्यक्तीला त्याच्या कार्याचा गौरव करून स्वयंस्फूर्त अशी श्रद्धांजलि अर्पण केली आहे.**

**लंडन टाईम्सः**– नेहरू म्हणजे स्वतः एक राष्ट्रच होते. त्यांच्या मृत्यूमुळे भारतीय इतिहासाचा एक कालखंड समाप्त झाला.

**डेली मेलः**– भारताला शक्तिशाली बनविण्याचे सारे श्रेय कै. नेहरूंनाच आहे. महान व्यक्तिमत्व असलेल्या त्यांच्या निधनाने केवळ भारतच नव्हे तर सारे जग पोरके झाले आहे.

**डेली हेरॉल्डः**–भारतापुढे आज अनेक प्रश्न, अनेक अडचणी असल्या तरी तेथे लोकशाही आणि स्वातंत्र्य टिकून आहे व हेच कै. नेहरूंचे स्मारक होय.

**न्यूयॉर्क टाईम्सः**–सर्व सत्ता हाती असूनहि हुकुमशहा बनण्यास नकार देणारा महान पुरुष. त्याने भारतावर व भारताने त्यांच्यावर अपार प्रेम केले.

**गार्डियनः**–चालू काळातील एक महापुरुष नेहरूंच्या निधनाने नाहीसा झाला.

**प्रावदाः**– (रशियन) :– चालू काळातील एक मोठा मुत्सद्दी, शांततेचा कट्टर पुरस्कर्ता आणि रशियाचा मित्र म्हणून रशियन जनता कै. नेहरूंना सदैव लक्षात ठेवील.

**इत्तेफाक्ः**–श्री. नेहरू हे कांही फक्त एकाच देशाचे व मर्यादित काळाचे नव्हते त्यांनी इतिहास घडविला आहे, ते अमर आहेत.

---

**आंतरराष्ट्रीय राजकारणात पोकळी निर्माण केली**

डाका, दि. २७

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि कौन्सिल ऑफ मुस्लिम लीगचे अध्यक्ष ख्वाजा निजामुद्दिन म्हणाले, "नेहरूंच्या मृत्यूने जगातील एक थोर व्यक्ति नाहीशी झाली असून आंतरराष्ट्रीय राजकारणांत पोकळी निर्माण झाली आहे.

पूर्वपाकिस्तानचे माजी मुख्य मंत्री श्री. अताऊर रहमान म्हणाले "नेहरू हे भारताच्या व शेजारी राष्ट्राच्या आशा–आकांक्षेचे प्रतीक होते."

* *

**युगांडा नॅशनल असेंब्लीत श्रद्धांजलि**

कम्पालां ता. २७ (प्रे. ट्र.)

युगांडाच्या राष्ट्रीय सभेत आज दुपारी सरकारी व विरोधी पक्षाच्या सदस्यांनी श्री. नेहरूंना श्रद्धांजलि अर्पण केली. नंतर सभा श्री. नेहरू यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शुक्रवारपर्यंत तहकूब करण्यात आली.

सांसदीय व घटनात्मक पद्धतीवर विश्वास ठेवणाऱ्या महान राजधुरिणाच्या स्मतिप्रित्यर्थ सर्वांनी दोन मिनिटे उभे राहावे असे पंतप्रधान ओबोट यांनी पार्लमेंटला सांगितले. सर्व ध्वज आज व उद्या अर्धे खाली उतरविलेले राहतील. उद्या राष्ट्रीय शोकदिन घोषित केला असून सर्व सरकारी कचेऱ्या बंद ठेवण्यात आल्या आहेत.

* * *

**नेपाळ**

नेपाळ सरकारच्या काठमांडूतील कचेऱ्या व सार्वजनिक संस्था आज नेहरूंच्या निधनानिमित्त शोक प्रदर्शनार्थ बंद राहतील. नेपाळी लष्करातर्फे नेहरूंच्या सन्मानार्थ १९ तोफांची सलामी देण्यात येईल.

काल रात्री बातम्याच्या १२ मिनिटांच्या वेळापैकी ८ मिनिटे नेहरूंच्या संबंधीच्या बातम्या देण्यात नेपाळ नभोवाणीने खर्च केली. नेहरूंचे जीवनचरित्र नभोवाणीवरून सांगण्यात आले. त्यांच्या निधनाच्या वार्तेने नेपाळला धक्का बसला, असे नेपाळ नभोवाणीवरून सांगण्यात आले.

संपादक : श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक : श्री. वसंतराव बोंबटकर
मुद्रक : श्री. वामनराव पाचपांडे, नई तालीम मुद्रणालय, सेवाग्राम.
स्वामित्व : महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.



**विनोबा वार्ता,** सेवाग्राम जि. वर्धा (महाराष्ट्र राज्य)

श्री. मामासाहेब क्षिरसागर.

विनोबा पदयात्री दल. C/o सर्वो. कार्यालय, कोटनमार्केट, आर्वी
वर्धा.